जा.क्र./पोउआ/वाह/२६८९/२०२०

**प्रेसनोट**

दिनांक -०६/०९/२०२०

पिंपरी चिंचवड शहरातील पिंपरी वाहतूक विभागाचे हद्दीत अहिल्यादेवी चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या ग्रेडसेपरेटरमध्ये मेट्रोचे पोल उभारणेचे काम करणार आहे. ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करुन मी सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, सदर रस्त्यावरील मेट्रो प्रकल्पाचे काम पूर्ण होईपर्यंत खालील प्रमाणे तात्पुरते बदल करण्यात येत आहेत.

## <u>पिंपरी वाहतुक विभाग अंतर्गत</u>

अहिल्यादेवी चौक, पिंपरी ग्रेडसेपरेटर मधील मुंबईकडुन पुण्याकडे जाणारी वाहतूक किज हॉटेल येथुन सर्व्हिस रोडने वळविण्यात येत आहे. तसेच पुण्याकडुन मुंबईकडे जाणारी वाहतूक ही खराळवाडी आऊट मधुन सर्व्हिस रोडने रात्रौ २३.००ते ०५.०० पर्यत वळविण्यात येत आहे.

(सुधीर हिरेमठ)भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त,
वाहतुक शाखा, पिं.चिं.शहर

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

प्रत:-

१)पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानापत्रातून प्रसिध्द करण्याची विंनती करावी.

२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.

३) पोलीस निरीक्षक पिंपरी वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार/ प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करुन त्यांची स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयात रिपोर्टासह दोन दिवसात सादर करावी.

४) एक्झक्युटीव्ह डायरेक्टर महाराष्ट्र मेट्रो रेल कॉरपोरेशन लि.पुणे

२/- सदर ठिकाणी वरील वाहतूक वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.